६४,महाराष्ट्र बटालियन, राष्ट्रीय छात्र सेना,
नाशिक यांना आहरण व संवितरण अधिकारी
(DDO) घोषित करणेबाबत...

महाराष्ट्र शासन
क्रीडा विभाग
शासन निर्णय क्रमांक : राछासे-२०२६/प्र.क्र.३७/E-१७०८५८७/क्रीयुसे-३
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई - ४०० ०३२
दिनांक : १७ जुलै, २०२६

वाचा :-

१) वित्त विभाग, शासन परिपत्रक क्र.संकीर्ण-१००९/प्र.क्र.२६/कोषा प्रशा-५, दि.२४.०६.२००३
२) वित्त विभाग, शासन निर्णय क्र.संकीर्ण-१००९/प्र.क्र.८८/२३/कोषा प्रशा-५, दि.०३.१०.२०२३
३) प्रशिक्षण विभाग, संरक्षण मंत्रालय, भारत सरकार यांचे पत्र क्र.४/६/२०२४-D(GS-VI) दि.१०.०४.२०२४
४) सहसंचालक,क्रीडा व युवक सेवा संचालनालय, पुणे, यांचे पत्र क्र.आस्थाप/राछसे/६४ महा. बटा/डीडीओ कोड/२०२६-२७/का-५, दि. २२.०५.२०२६

प्रस्तावना :-

"१ महाराष्ट्र आर्मड स्क्वॉडर्न, राष्ट्रीय छात्र सेना, मुंबई" हे कार्यालय कायमस्वरुपी नाशिक येथे स्थलांतरित होऊन सदर कार्यालयाचे नामकरण **"समादेशक अधिकारी, ६४ महाराष्ट्र बटालियन, राष्ट्रीय छात्र सेना, नाशिक"** असे करण्यात आलेले आहे. सद्यस्थितीमध्ये हे कार्यालय "६४ महाराष्ट्र बटालियन राष्ट्रीय छात्रसेना" पथक २ रा मजला, एनसीसी इमारत, पी. अँड टी कॉलनी, शरणपुर रोड, नाशिक येथे कार्यरत आहे.

तथापि समादेशक अधिकारी, "६४ महाराष्ट्र बटालियन, राष्ट्रीय छात्र सेना, नाशिक" कार्यालयाच्या नामकरण व स्थलांतरामुळे त्यांना कोणताही आहरण व संवितरण अधिकारी सांकेतांक क्रमांक (Drawing & Disbursing Officer (DDO) Code No) मंजूर नसल्यामुळे तसेच हे कार्यालय नाशिक येथे कायमस्वरुपी स्थलांतरीत झाले असल्याकारणाने यापूर्वी प्राप्त, "१ महाराष्ट्र आर्मड स्कार्डन एन सी सी मुंबई" यांच्या DDO क्रमांकाचा वापर करुन शकत नाही.

समादेशक अधिकारी, ६४ महाराष्ट्र बटालियन, राष्ट्रीय छात्र सेना, नाशिक कार्यालयाच्या नामकरण व स्थलांतरामुळे सदर कार्यालयास कोणताही आहरण व संवितरण अधिकारी सांकेतांक क्रमांक (Drawing & Disbursing Officer (DDO) Code No) मंजूर नसल्यामुळे राज्य शासनाचे अनुदान, दैनंदिन प्रशासकीय व आर्थिक कामकाजात विविध अडचणी निर्माण होत आहेत. सबब, समादेशक अधिकारी, ६४ महाराष्ट्र बटालियन, राष्ट्रीय छात्र सेना, नाशिक कार्यालयाच्या नामकरण व स्थलांतरामुळे आहरण व संवितरण अधिकारी सांकेतांक क्रमांक (Drawing & Disbursing Officer (DDO) Code No) मंजूर करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय-

राज्य शासनाचे अनुदान, तसेच दैनंदिन प्रशासकीय व आर्थिक कामकाजासाठी **"६४ महाराष्ट्र बटालियन, राष्ट्रीय छात्र सेना, नाशिक"** कार्यालयासाठी पुढील विवरणपत्रात नमुद केल्याप्रमपाणे नियंत्रक अधिकारी (CO) व आहरण व संवितरण अधिकारी(DDO) घोषित करण्यात येत आहेत:-

अ.क्र.	**कार्यालयाचे नांव**	**नियंत्रक अधिकारी**	**आहरण व संवितरण अधिकारी**
१.	६४ महाराष्ट्र बटालियन, राष्ट्रीय छात्र सेना, नाशिक	आयुक्त, क्रीडा व युवक सेवा, पुणे	समादेशक अधिकारी, ६४ महाराष्ट्र बटालियन, राष्ट्रीय छात्र सेना, नाशिक

२. समादेशक अधिकारी, ६४ महाराष्ट्र बटालियन, राष्ट्रीय छात्र सेना, नाशिक, यांनी आहरण व संवितरण अधिकारी सांकेतांक प्राप्त करून घेण्यासाठी वित्त विभागाच्या संदर्भाधीन क्र.१ येथील दि.२४.०६.२००९च्या शासन परिपत्रकात नमूद केलेल्या कार्यवाहीचा अवलंब करावा, तसेच आहरण व संवितरण अधिकारी आणि नियंत्रक आधिकारी यांनी वित्त विभागाच्या संदर्भाधीन क्र.०२ येथील दि.०३.१०.२०२३ च्या शासन निर्णयातील सुचनांचे काटेकोर अनुपालन करावे.

३. सदर शासन निर्णय, वित्तीय अधिकार नियम पुस्तिका, १९७८ मधील भाग-पहिला, उपविभाग-एक मधील अ.क्र.३ नियम क्र.२ अन्वये व महाराष्ट्र कोषागार अधिनियम, १९६८ मधील नियम १५ (३) व नियम क्र. १५६ व नियम २८२ तसेच मुंबई वित्तीय नियम, १९५९ मधील नियम ५७ अन्वये प्रशासकीय विभागांना प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांतर्गत आणि वित्त विभागाने अनौपचारिक संदर्भ क्र. २११/२०२६/कोषा प्रशा-५, दि.१३.०७.२०२६ अन्वये दिलेल्या सहमतीस अनुसरुन निर्गमित करण्यात येत आहे.

४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२६०७१७१७२१३१२०४२ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

LALIT SHARMA

Digitally signed by LALIT SHARMA
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=SESD, 2.5.4.20=DB621A906466D6D122480FEC81754F785664F0E4831D61AF10980A0CF453BED3, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=66B04DB68665A3A183AC7ACE7607F621695A02F5FD309828173A72DF54E495E1, cn=LALIT SHARMA
Date: 2026.07.17 17:22:28 +05'30'

(ललित शर्मा)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा.राज्यपालाचे प्रधान सचिव, राजभवन, मुंबई.
२. मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय,मुंबई
३. मा.उपमुख्यमंत्री तथा मंत्री (क्रीडा व युवक कल्याण) यांचे सचिव, मंत्रालय,मुंबई
४. मा.उपमुख्यमंत्री (नगर विकास व गृहनिर्माण) यांचे सचिव, मंत्रालय,मुंबई
५. सर्व सन्मा. विधानपरिषद/ विधानसभा सदस्य, महाराष्ट्र विधानमंडळ, मुंबई
६. प्रधान सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे स्वीय सहायक
७. मा. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र-१/२, मुंबई/नागपूर

८. मा. महालेखापाल (लेखा परिक्षा) महाराष्ट्र-१/२, मुंबई/नागपूर
९. आयुक्त, क्रीडा व युवक सेवा, महाराष्ट्र राज्य, पुणे.
१०. विभागीय क्रीडा उपसंचालक, नाशिक विभाग, नाशिक.
११. समादेशक अधिकारी, ६४ महाराष्ट्र बटालियन, राष्ट्रीय छात्र सेना, नाशिक
१२. जिल्हा कोषगार अधिकारी, नाशिक (संचालनालयामार्फत)
१३. वरिष्ठ कोषागार अधिकारी, नाशिक (संचालनालयामार्फत)
१४. वित्त विभाग (कार्यासन व्यय-५/अर्थसंकल्प-८) मंत्रालय, मुंबई
१५. अर्थसंकल्प शाखा, शालेय शिक्षण व क्रीडा, मंत्रालय, मुंबई.
१६. निवड नस्ती (क्रीयुसे-३).